सातारा

सकाळ

सातारा, गुरुवार, ५ फेब्रुवारी २०१५

५

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# विद्यार्थ्यांच्या विकासात पालकांचीही जबाबदारी

## चंद्रकांत बर्गे; डी. पी. भोसले महाविद्यालयात पालक मेळाव्यास प्रतिसाद

**पळशी, ता. ४ :** विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडविण्यामध्ये महाविद्यालयाएवढीच पालकांची जबाबदारीही महत्त्वपूर्ण आहे. त्याचबरोबर महाविद्यालयामध्येही दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा चंद्रकांत बर्गे यांनी व्यक्त केली.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये झालेल्या बारावीच्या विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या पालक मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय सावंत होते. आपल्या पाल्यास आयआयटीच्या चांगल्या महाविद्यालयात प्रवेश कसा मिळेल,



**कोरेगाव : डी. पी. भोसले महाविद्यालयातील पालक मेळाव्यात बोलताना डॉ. विजय सावंत. शेजारी अरुण बर्गे, चंद्रकांत बर्गे, पृथ्वीराज बर्गे, राजेश बर्गे.**

या दृष्टीने पालकांनी विचार करून पूर्वतयारी करावी, असे आवाहन श्री. बर्गे यांनी केले. पदवीसाठी सध्या सातारा येथे जाणारा विद्यार्थी याच महाविद्यालयात शिकला पाहिजे. त्यासाठी पदवीस्तरावरचे वर्ग सुरू करावेत. जेईई परीक्षेसाठी क्रॅश कोर्सच्या माध्यमातून तयारी करून घ्यावी. त्यासाठी सर्व पालकांची संमती असल्याचे माजी प्राचार्य अरुण बर्गे, राजेश बर्गे, पृथ्वीराज बर्गे यांच्यासह उपस्थित पालकांनी सांगितले. डॉ. सावंत म्हणाले, जेईई परीक्षेसाठी महाविद्यालयात क्रॅश कोर्स राबविण्यात येत आहे. पुढील पाच वर्षे गृहीत धरून हे व्हिजन तयार केले आहे. मात्र, पालकांनी किमान सहा महिन्यांतून एकदा महाविद्यालयात येऊन आपल्या पाल्याच्या अभ्यासाविषयी चौकशी करावी. एस. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. पद्मिनी मोकाशी, एस. व्ही. देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. संदेश सोळसकर यांनी आभार मानले. यावेळी उपप्राचार्य उमाकांत मुळे, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.